# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३३/२०१०/ दिनांक :

श्री. हणमंत सत्याप्पा कळ्ळी,
मु.पो. करजगी, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि., संवसु मंडळ कार्यालय,
विश्रामबाग , सांगली.
२) कार्यकारी अभियंता,
महावितरण, विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ,
जिल्हा सांगली.
३) सहाय्यक अभियंता,
महावितरण, उप विभाग, संख जि. सांगली — विरूध्द पक्षकार

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

<u>श्री. जी.सी. लेले, सदस्य,</u> ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. हणमंत स. कळ्ळी, मु.पो. करजगी, ता. जत, जि. सांगली यांनी दि. ११.२.२०१० रोजी अर्ज करुन वि.प.ने शेड्यूल ऑफ चार्जेसच्या अनुसरुन नसलेली रक्कम भरुन घेतलेली आहे, ती परत मिळावी म्हणून अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार मंचामध्ये दाखल करण्यापूर्वी २०.११.२००९ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष सांगली येथे तक्रार दाखल केलेली होती. सदर तक्रारीचा निर्णय मान्य न झालेने मंचासमोर अर्ज दाखल केला आहे. सदरचा अर्ज ग्राहकाने श्री. हरिभाऊ खापरे या प्रतिनिधीमार्फत दाखल केला आहे. मंचाने अर्ज दाखल करुन घेवून वि.प.कडून संबंधित तक्रारी संदर्भात मुद्देनिहाय अभिप्राय मागविला.

मुद्देनिहाय अभिप्राय प्राप्त झाल्यावर दि. २३.३.२०१० रोजी मंचाने सदर प्रकरण सुनावणीसाठी घेण्यासंबंधी उभयतांना तसे कळविले. तथापि दि. २३.३.२०१० ही सुनावणीची तारीख मार्च महिन्यामधील थकबाकी वसुलीसाठी काम असल्याने अयोग्य आहे व मुदत मिळावी अशी मागणी वि.प.ने मंचाकडे नोंदविली त्यास अनुसरुन मंचाने पुढील तारीख निश्चित केली. सुनावणीच्यावेळी वि.प.चे प्रतिनिधी श्री. हरिभाऊ खापरे व कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. तक्रारीचे सर्वसाधारण स्वरुप व वि.प.ची भूमिका पुढील प्रमाणे –

तक्रारदार यांनी वितरण कंपनीकडे आपल्या शेतीपंपासाठी विद्युत पुरवठा मिळावा म्हणून दि. ४.११.२००३ रोजी रु. ४९७०/– इतकी अनामत रक्कम भरली आहे, त्याचा पावती क्र. ३३३७००७ असा आहे. तक्रारदार यांनी कृती मानके या विनियमातील तरतुदीनुसार वीज जोडणीचा आदेश मिळावा, विलंबाबद्दल ग्राहक भरपाई मिळावी तसेच मिटरची रु. २२५०/–, कपॅसिटर टेस्टिंग फी रु. १००/– व करारपत्राचे रु. २०/– ही रक्कम महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या शेड्यूल ऑफ चार्जेस प्रमाणे परत मिळावी व त्यावर व्याजही मिळावे अशी मागणी नोंदविली आहे. वि.प.ने आपल्या मंचासमोरील सुनावणीच्यावेळी केलेला युक्तीवाद व दाखल केलेला मुद्देनिहाय अभिप्राय या नुसार ग्राहकाने दिनांक ४.११.२००३ रोजी अनामत रक्कम भरलेली आहे ही बाब मान्य करुन प्रत्यक्षात तपासणी केली असतां संच मांडणी केली नसल्यामुळे विद्युत जोडणी देता आली नाही हे नमूद केले आहे. तसेच सदरची सर्व रक्कम शेड्यूल ऑफ चार्जेसचा आदेश होण्यापूर्वी भरली असल्यामुळे रक्कम परत देणे अयोग्य आहे, मात्र कपॅसिटर टेस्टिंग फी व करारपत्र फी बिलातून वापस करण्यात येईल, मिटरची किंमत देता येणार नाही असे नमूद केले आहे. तसेच संच मांडणी करुन कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर जोडणी देण्यात येईल असेही स्पष्ट केले आहे.

ग्राहक प्रतिनिधींनी आपल्या म्हणण्यापृष्ट्यर्थ विद्युत नियामक आयोग केस क्र. ७०/२००५ दि. ८.९.२००६ चे आदेशावर तसेच मा. विद्युत लोकपाल केस क्र. ११/२००९ दि. २५.२.२००९ च्या आदेशावर भर दिलेला आहे. वरील सर्व बाबींच्या अवलोकनानंतर खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात.

१) ग्राहकाने भरलेली मिटरची किंमत रु. २२५०/– वि.प.कडून परत देणे योग्य आहे किंवा कसे ?

उत्तर : होय. तसे मा. आयोग केस क्र. ७०/२००५ दि. ८.९.२००६ व मा. विद्युत लोकपाल केस क्र. ११/२००९ दि. २५.२.२००९ या निर्णयात स्पष्ट केले आहे.

२) भरपाई देणे योग्य आहे काय ?

उत्तर : विनियमातील तरतुदीप्रमाणे भरपाई देणे योग्य आहे तथापि ग्राहकाने चाचणी अहवालाची पूर्तता करणे आवश्यक आहे. त्यामुळे तशी पूर्तता न केल्याने भरपाई देणे अयोग्य होईल असे उत्तर आहे.

३) आदेश ?

खालील प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

ग्राहकाच्या प्रतिनिधींनी मुख्यत्वेकरुन वीज जोडणी मिळावी, विलंबाबद्दल भरपाई मिळावी व शेड्यूल ऑफ चार्जेसच्या विरुध्द भरुन घेतलेली रक्कम परत मिळावी अशा प्रामुख्याने मागण्या नोंदविलेल्या दिसून येतात. पैंकी ग्राहकाने खर्च करावयाचे चलन भरल्यानंतर पुढील पूर्ततेसाठी चाचणी अहवाल देणे आवश्यक व बंधनकारक आहे तशी कृती ग्राहकाने केली नसल्याचे वि.प.च्या लेखी म्हणण्यावरुन दिसून येते.

तथापि ग्राहकाने सदरचा चाचणी अहवाल दि. १७.१०.२००८ रोजी दिल्याचे आपल्या मागणीपत्रात नोंदविले आहे. मात्र त्या बाबतीत सुनावणीच्यावेळी वि.प.चे प्रतिनिधी आग्रही दिसले नाहीत. त्यामुळे नव्याने चाचणी अहवाल देवून कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर वीज जोडणी देण्यात यावी असा आदेश मंच करीत आहे.

दि. ४.११.२००३ रोजी संबंधित ग्राहकाने अनामत रक्कम भरली ही बाब उभयतांना मान्य आहे. तसेच अद्यापही सदर अनामत रक्कम ज्या कारणासाठी भरली ती वीज जोडणी अद्यापही द्यावयाची आहे हेही उभयतांना मान्य आहे. अशा परिस्थितीत मंचाने सर्व बाबींचा विचार करुन वीज जोडणी देतांना जो प्रचलित कायदा वा त्यासंबंधी न्यायालय अथवा मा. विद्युत लोकपाल यांनी दिलेले आदेश याचा विचार करणे योग्य आहे याची दक्षता घेतली व त्यामुळे अद्यापही जोडणी देण्याची आहे व राज्य आयोगाच्या शेड्यूल ऑफ चार्जेस नुसार मीटर कपॅसिटर टेस्टिंग फी, करारपत्र फी इ. रकमा वि.प.स वसूल करता येणार नाही ही बाब सूर्यप्रकाशा इतकी स्वच्छ असतांनाही वि.प.ने मिटरच्या किंमती शिवाय कपॅसिटर टेस्टिंग फी व करारपत्र फी बिलातून वापस करण्यात येईल असे केलेले लेखी निवेदन हास्यास्पद वाटते. त्यामुळे शेड्यूल ऑफ चार्जेस व त्यासंबंधीचे सर्व आदेश याचा एकत्रित विचार करुन मंच मिटरच्या किंमतीसह कपॅसिटर टेस्टिंग फी व करारपत्र फी अशी सर्व रक्कम एकत्रित वि.प.ने रोखीने अदा करावी असा आदेश देत आहे.

ग्राहकाच्या प्रतिनिधीने सादर केलेल्या मा.विद्युत नियामक आयोग केस क्र. ७०/२००५ तसेच मा. विद्युत लोकपाल केस क्र. ११/२००९ दि. २५.२.२००९ या आदेशाचा विचार मंचाने केला आहे व तसेच वि.पुरवठ्यसाचा कालावधी व वि. पु. इतर अटी, कृे मा. २००५ मयील परिशिष्ट ‘ अ ‘ हेही दि.२०.१.२००५ पासून अंमलात आलेले आहे. तक्रारदाराचा अर्ज दि. ४.११.२००३ पासून प्रलंबित असलेने वरील सर्व आदेशांचा आधार मंचाने घेतला आहे व त्याप्रमाणे वि.प.स मिटरची किंमत रु. २२५०/– देण्याची जबाबदारी आहे याची खातरजमा केलेली आहे व त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात आलेले आहे.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.
२) वि.प.ने तक्रारदार यांस मिटरची किंमत २२५०/–, कपॅसिटर टेस्टिंग फी रु.१००/– व करारपत्र फी २०/– अशी एकूण रक्कम रु. २३७०/– एक रकमी अथवा डिमांड ड्राफ्टने अथवा चेकने ग्राहकास अदा करावी व तशी पावती ग्राहकाकडून घ्यावी.
३) तक्रारदार ग्राहकाने चाचणी अहवालाची पूर्तता करुन वि.प.कडे तशी नोंद द्यावी तद्नंतर वि.प.ने संच मांडणीची खातरजमा करुन घेवून कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर प्राधान्यक्रमांनुसार वीज जोडणी देण्यात यावी.
४) खर्चाबाबत आदेश नाही

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : (जी. सी. लेले)
सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष ..

श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव ..